नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १३/०५/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील वडोदा ते गुमथाळा कच्चा रोड कप्लना ॲगो कंपनी जवळ वडो ता कामठी जि नागपुर येथे दिनांक ११.०५.२२ चे २२.०० ते दिनांक १२.०५.२२ चे ११.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— पवन सत्यवान मेश्राम वय ३४ वर्ष, रा. घोरपड ता कामठी जि नागपुर याने दुकानातील विदेशी दारू किंमत एकुन २४,८३५/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मनोहर जंगवाड मो.क्र ८३२९९४८१०१ हे करीत आहे.

**२) पो .स्टे. सावनेर** :— अंतर्गत खदान क्र १ डब्लुसिएल सावनेर येथे दिनांक १२.०५.२२ चे ०१.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे— विलास साबंशिव चौधरी वय ५८ वर्ष रा. क्वॉ. न ८१/२ शक्ती नगर, डब्लुसिएल सावनेर हे डब्लुसिएल सावनेर उपक्षेत्र येथे सुरक्षा गार्ड प्रमुख या पदावर कार्यरत असुन यातील खदान क्र १ डब्लुसिएल सावनेर च्या मालकीचे खुल्या जागेत ठेवलेले नवीन लोखंडी बोलटींग रॉड ५० ते ६० नग कि. ३०,०००/—रू. चा माल आरोपी १) अमोल कमाले २) मनु ठाकुर ३) शुभम ठाकुर व ४) विजय बेहुने सर्व रा. पहलेपार सावनेर यांनी संगणमत करून चोरून नेण्याचा प्रयत्न करतांना दिसुन आल्याने माल त्याच ठिकानी टाकुन रात्री अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अनिल तिवारी मो क्र. ९६८९८९१४८६ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत १५ कि.मी अंतरावरील मौजा लोहारी सावंगा येथे दिनांक ०९/०५/२०२२ चे १२.०० वा. ते १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्रीमती आशा तेजराव गांवडे, वय ६२ वर्ष, रा. लोहारी सावंगा ता.नरखेड याचे खाते तसेच फिर्यादीची आई यांचे खाते स्टेट बॅक ऑफ इंडीया शाखा लोहारी सावंगा चे असुन सदर बॅकेत ४ एफ.डी. प्रत्येकी ८०,०००/—रु. आहे. फियादीस दि. ०९/०५/२२ रोजी आरोपीने अंगणवाडी कामकाज करण्याचा मोबाईल वर फोन करुन आधार कार्ड व खाते क्र घेवुन बैकेतुन बोलत असल्याची बतावणी करुन फिर्यादी यांच्या कडुन के.वाय.सी. करणेकरीता पास बुक क्रमांक व आधार कार्ड नंबर घेवुन एकुण २,७३,४२०/— रक्कम काढुन बैकेची व फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(क)(ड) माहिति तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री मनोज चौधरी ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**